


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ८०४ वा | रविवार | दि. १६ जून २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# विधानसभेसाठी महाविकास आघाडीची मोठी घोषणा लवकरच जागावाटप जाहीर करणार...

**वृत्तसंस्था/मुंबई**

लोकसभा निवडणुकीप्रमाणेच आगामी विधानसभा निवडणुका महाविकास आघाडीतील सर्व मित्र पक्ष एकत्रित लढणार असल्याची घोषणा महाविकास आघाडीच्या नेते मंडळींनी शनिवारी मुंबईतील संयुक्त पत्रकार परिषदेत केली. त्याचवेळी लोकसभा निवडणुकीत ज्या ताकदीने निवडणुकांना सामोरे गेलो, त्याहून अधिक ताकदीने विधानसभा निवडणुकांना सामोरे जाऊ असा विश्वास यावेळी महाविकास आघाडीच्या सर्व प्रमुख नेत्यांनी व्यक्त केला. दरम्यान, विधानसभेसाठी लवकरच जागावाटप जाहीर करण्यात येईल, अशी घोषणाही यावेळी करण्यात आली. महाराष्ट्रातील जनतेला लोकसभेत जो आशीर्वाद दिला तो विधानसभेतही मिळेल, त्यामुळे महाराष्ट्रात निश्चित सत्ताबद्दल होईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.महाविकास आघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेचे आयोजन शनिवारी मुंबईत करण्यात आले होते. त्यावेळी वरील घोषणा करण्यात आली. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह इतर अनेक बडे नेते यावेळी उपस्थित होते.यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, जेव्हा तीन पक्ष एकत्र पत्रकार परिषद घेतात, तेव्हा माध्यमांसमोर येण्याआधी आमची प्राथमिक बैठक होते. येणारी विधानसभेची निवडणूक महाविकास आघाडी म्हणून आम्ही तीन पक्ष आणि इतर काही सामाजिक संघटना आणि छोटे पक्ष मिळून लढणार आहोत, असे त्यांनी यावेळी जाहीर केले. तर भाजपकडून महाविकास आघाडीच्या नेत्यांवर नरेटिव्ह सेट करण्याबाबत टीका करण्यात येत होती. या टीकेलाही उद्धव ठाकरे यांनी सडेतोड उत्तर दिले.यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, यांना मत दिले तर हे तुमची संपत्ती जास्त मुले होणाऱ्यांना



वाटतील, मंगळसूत्र उचलून नेतील, तुमच्या घरातील नळ काढून नेतील, वीज कापतील हे काय खरं नरेटीव्ह होते का, तुमची म्हैस चोरुन नेतील हे काय खरे नरेटिव्ह होते का? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला. नकली सेना, नकली संतान, प्रत्येकाला नोकरी देईन, प्रत्येकाला घरे देईन, उद्योगधंदे येतील, हे खरं नरेटीव्ह होते का, याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

---

## डिडोळ्यातील युवकाच्या हत्येप्रकरणी एकास अटक आरोपीला तीन दिवसांची पोलिस कोठडी

**जनसंचलन/मलकापूर**

तालुक्यातील धरणगावात डिडोळ्यातील युवकाची हत्या केल्याच्या आरोपावरून गावातील एकास पोलिसांनी मृतक दिपक सोनोने शुक्रवारी रात्री अटक केली. इतर दोन संशयितांची कसून चौकशी सुरू आहे. अटकेतील आरोपीला तीन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने शनिवारी दिला. याप्रकरणी आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. धरणगाव येथील खंडोबा मंदिरानजिकच्या खुल्या सभागृहात मोताळा तालुक्यातील डिडोळ्याच्या २१ वर्षीय दीपक सुधाकर सोनोने याची हत्या झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी तिघा संशयितांना ताब्यात घेतले होते. तसेच मृतकाचा भाऊ विजय सुधाकर सोनोने याच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला होता. ताब्यात घेण्यात आलेल्या तिघा




संशयितांची पोलिस चौकशी सुरू होती. घटना अतिशय विचित्र पद्धतीने घडल्यामुळे आरोपींचा पोलिसांसाठी आव्हान ठरले होते. शोध या घटनेत बुलढाणा येथील श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. त्याने मलकापूर पोलिसांनी सर्वप्रथम ताब्यात घेतलेल्या व्यक्तीच्या घराकडे मोर्चा वळवला होता. त्याचबरोबर देहबोलीतून संशय बळावला. त्या अनुषंगाने पोलिसांनी स्थानिक रहिवासी अनिल राजाराम इंगळे (४८) याला शुक्रवारी उशिरा रात्री अटक केली. शनिवारी दुपारी आरोपी अनिल राजाराम इंगळे याला न्यायालयात हजर करण्यात आले. तर इतर दोघा संशयितांची चौकशी सुरू आहे. याप्रकरणी आणखी आरोपी वाढण्याची शक्यता आहे.

## राज्यात मविआ सुसाट,शरद पवारांनी मानले मोदींचे जाहीर आभार

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यात मविआ सुसाट, शरद पवारांनी मानले मोदींचे जाहीर आभार महाविकास आघाडीचे नेते शरद पवार, उद्धव ठाकरे आणि पृथ्वीराज चव्हाण यांनी एकत्रित मिळून मुंबईत आज पत्रकार परिषद घेतली. लोकसभेच्या निकालातील यशानंतर पहिल्यादांच मविआने एकत्रितरित्या पत्रकार परिषद घेत मतदारांचे आभार मानले. पण यावेळी शरद पवारांनी मतदारांऐवजी चक्क पीएम मोदींचे आभार मानले.ङ्घङ्घपीएम मोदींनी जिथे जिथे सभा घेतल्या तिथे तिथे मविआने चांगले यश मिळवलेङ्घङ्घ असे शरद पवार म्हणाले.पीएम मोदींनी ज्या मतदारसंघात रोड शो आणि प्रचारसभा घेतल्या त्या ठिकाणी आम्ही जिंकलोय, त्यामुळे मला वाटते माझे कर्तव्य आहे पीएम मोदींचे आभार मानणे, मोदींमुळे महाविकास आघाडीसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले असे म्हणत मोदींचे भरसभेत शरद पवारांनी आभार मानले.महाराष्ट्रात भाजपला यंदाच्या लोकसभेत मोठा फटका बसलाय. २०१९ च्या विधानसभेनंतर राज्यात राजकीय गणिते बरीच बदलली, त्यामध्ये सेना आणि राष्ट्रवादीच्या बंडखोरीनंतर राजकीय समीकरणे आणखी बदलेली दिसली, त्यामुळे बंडखोरीनंतर झालेल्या पहिल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठा फटका बसला असे चित्र दिसले. राज्यात ४८ जागांपैकी भाजपला फक्त ९ जागांवर यश मिळाले.निवडणुक आयोगाच्या वेबसाईटवर जाहीर झालेल्या निकालानुसार यंदा भाजपला बहुमताचा आकडा गाठता आला नाही. मित्रपक्षांच्या साह्याने भाजपाने एनडीए सरकार स्थापन केले. राज्यातील ४८ जागांपैकी १८ जागांवर मोदींनी प्रचारसभा घेतल्या पण १५ जागांवर भाजपला यश मिळवता



आले नाही. हाच विषय पकडून पवारांनी धन्यवाद मानत मोदींना अपयशाच्या मुद्द्यावरुन डिवचले.पत्रकार परिषदे दरम्यान शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना बंडखोरांना तुम्हीही परत घेणार का? असा सवाल विचारण्यात आला. यावर उत्तर देताना पवार आणि ठाकरेंनी एकसूर मिसळत आता बडखोरांना पुन्हा घेणार नाही अशी ग्वाही दिली. तर विधानसभा निवडणुक महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढणार असे पवार आणि ठाकरेंनी एकत्र सांगितले. लवकरच जागावाटप होईल असे पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकारांना माहिती दिली.

# सर्व शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी पीक कर्ज घ्यावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## ३० जून पूर्वी पुनर्गठन केल्यास शून्य टक्के व्याज

**जनसंचलन/बुलडाणा**

येत्या खरीप हंगामासाठी पीक कर्जाचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना यातून मुबलक प्रमाणात कर्ज पुरवठा होणार आहे. बियाणे, रासायनिक खते यासाठी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी पुढे येऊन पीक कर्ज घ्यावे, तसेच शून्य टक्के व्याज दराचा लाभ घेण्यासाठी जुन्या पीक कर्जाचे ३० जून पूर्वी पुनर्गठन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. जिल्ह्याला १५०० कोटी रुपयाचा पीक कर्ज आराखडा मंजूर झाला आहे. यात आतापर्यंत ३० टक्के म्हणजेच सुमारे ४५० कोटी रुपये वाटप करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना विनासायास कर्जपुरवठा व्हावा, यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेण्यासाठी बँकेमध्ये अर्ज करावा. कर्ज मिळण्यास अडचण आल्यास जिल्हा अग्रणी बँकेतर्फे संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी ७५०७७६६००४ या क्रमांकावर संपर्क करावा. शेतकऱ्यांनी मागील खरीप हंगामासाठी पीक कर्ज घेतलेले असल्यास सदर पीक कर्जाची परतफेड ३० जून पूर्वी करणे आवश्यक आहे. ३० जून पूर्वी कर्जाची परतफेड झाल्यास शेतकऱ्यांना व्याज सवलत योजनेचा लाभ होणार असून शून्य टक्के व्याजदर लागणार आहे. तसेच कर्जाचे पुनर्गठन केल्यासही शून्य टक्के व्याजाने आकारणी होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कोणतेही व्याज भरावे लागणार नाही. पीक कर्ज घेतल्याने शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदर, सिबिल स्कोर आदी फायदे होणार आहेत



शेतकऱ्यांना सुलभरीत्या कर्ज पुरवठा होण्यासाठी प्रत्येक बँकेत विशेष खिडकी निर्माण करण्यात आली आहे. या ठिकाणी केवळ शेतकऱ्यांचे पीक कर्जाचे अर्ज निकाली काढण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज घेताना कोणताही त्रास होणार नाही. शेतकऱ्यांचे पीक कर्जाची प्रकरणे जलद गतीने मंजूर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिले आहे.

# मोटार वाहन निरीक्षक अनुजा काळमेघ यांची अपघातग्रस्तांना मदत

**जनसंचलन/बुलढाणा**

देऊळगाव मही येथे वाहन तपासणी करणाऱ्या पथकाला वाहनाचा गंभीर अपघात झाल्याचे निदर्शनास आले. या पथकातील सहायक मोटार निरीक्षक अनुजा काळमेघ यांनी या अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय मदत करून अपघातग्रस्तांना मदत करण्याचा संदेश दिला आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बुलडाणा येथील वाहन तपासणी पथकाद्वारे जिल्ह्यातील विविध रस्त्यावर वाहन तपासणी करण्यात येते. या कार्यालयाचे वाहन तपासणी पथकाकडून तपासणी चालू असताना दि. १३ जुन २०२४ रोजी देऊळगाव मही जवळ एमएच २८ बीबी ८२०२ वाहनाचा गंभीर अपघात झालेला दिसून आला. सदर अपघातात एक युवक गंभीररित्या जखमी झाला होता. या युवकाला सहायक मोटार वाहन निरीक्षक अनुजा काळमेघ आणि वाहन चालक आर. एम. डाकणे यांनी आपल्या वाहनातून रूग्णालयात दाखल केले. यातून त्यांनी नागरिकांमध्ये अपघातग्रस्तांना मदत करण्याचा संदेश दिला. सदर कार्य





हे प्रशंसनीय आहे. रस्त्यावर अपघात झाल्यास जखमी व्यक्तींना मदत करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. नागरिकांमध्ये अपघातग्रस्तांना मदत केल्यास पोलीस केस कारवाई आणि न्यायालयात जावे लागेल, अशी धारणा असते. त्यामुळे अपघाताग्रस्तांना मदत करण्यासाठ नागरिक पुढे येत नाहीत. परंतु शासनाने रस्त्यावर अपघाताचे वाढते प्रमाण आणि समस्या लक्षात घेता अपघातग्रस्त व्यक्तींना अपघाताचे वेळी मानवतेच्या दृष्टीकोनातून प्राथमिक उपचार घेण्यासाठी मदत केली असल्यास मोटार वाहन कायद्यातील २०१९ मधील सुधारित कलम १३४ ए नुसार कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना कोणत्याही कायदेशीर चौकशीला सामोरे जावे लागत नाही. अपघातग्रस्त व्यक्तींना मानवतेच्या दृष्टीने मदत करण्यासाठी सर्वसाधारण जनतेने समोर यावे. अपघातग्रस्त व्यक्तींना मदत केल्यास त्यांना कोणत्याही चौकशीला सामोरे जावे लागणार नाही. तसेच कोणताही नाहक त्रास होणार नाहीं, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे यांनी केले आहे.

# धानोरी तलाव मत्स्य विभागाकडे हस्तांतरीत

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाने सुधारीत तलाव, जलाशय धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागाच्या मालकीचा धानोरी क्र. २ तलाव जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग कार्यालयाकडून मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत झाला आहे. सदर तलाव जलाशय परिसरातील स्थानिक नागरिकांना, प्रकल्पग्रस्त, मागासवर्गीय व महिला यांना संधी मिळण्याच्या दृष्टीने १०.२२ हेक्टरचा धानोरी क्र. २ मृद व जलसंधारण तलावावर मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था नोंदणी करण्याचा प्रस्ताव सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), बुलढाणा यांच्याकडे सादर करण्याबाबतचे आवाहन मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त सु. ग. गावडे यांनी केले आहे.

# ई-पॉस यंत्राऐवजी आता आय स्कॅनर

## ठसे उमटत नसलेल्या रेशनधारकांसाठी फोर जी ई-पॉससोबत डोळे स्कॅनचा पर्याय...

**जनसंचलन/ लोणार**

धान्य वितरणात सुलभता यावी या उद्देशाने जुनाट ई-पॉस यंत्राच्या ऐवजी आता नवीन अत्याधुनिक ४ जी यंत्र तसेच आय स्कॅनर उपलब्ध करून देण्यात आले आहे. बोटांचे ठसे जुळत नसलेल्या शिधापत्रिकाधारकांचे डोळे स्कॅन करून त्यांना धान्य वितरित केले जाणार असल्याने रिकाम्या हाती जावे लागणार नाही ठसे जुळत नसलेल्यांची दुकानदाराशी होणारी तू-तू-मैं-मैं यापुढे बंद होणार आहे. तालुक्यात ९६ स्वस्तधान्य दुकानदारांना प्राप्त झालेल्या यंत्राचा वापर करून धान्य वितरण सुलभ झाले आहे. स्वस्त धान्य दुकानात धान्य वितरणात पारदर्शकता येण्यासाठी गेल्या काही वर्षापासून ई-पॉस यंत्रे बसविण्यात आली आहे. या यंत्रात आधार क्रमांक टाकल्यावर शिधापत्रिकेतील लाभार्थ्यांच्या बोटाचे ठसा घेऊन धान्य वितरण करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत होती. २ जी सीमवरील ही ई-पॉस यंत्रे मोबाईल रेंजच्या अडचणीमुळे हाताळणे अवघड झाली होती. शिवाय बोटांवरील रेषा पुसट झाल्याने काहींचे ठसे उमटत नव्हते. यात वयोवृद्धांचे



ठसे जुळत नसल्याने दुकानदारांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. शिधापत्रिकाधारक परिचित असूनही तांत्रिक अडचणीमुळे त्याला धान्य वितरित करता येत नव्हते. धान्य वितरित केले तरी ऑनलाईन नोंद होत नसल्याने दुकानदाराला त्याचा फटका बसत होता. त्यामुळे स्वस्त धान्य दुकानदारांच्या संघटनांनी गेल्या काही महिन्यांपासून फोर जी ई-पॉस यंत्रे देण्याची मागणी केली होती. त्यानुसार आता शासनाच्या पुरवठा विभागाने नवीन आधुनिक फोर जी ई-पॉस यंत्रे उपलब्ध करून दिली आहेत. या यंत्रात आय स्कॅनर चा पर्याय देण्यात आलेला आहे. यामुळे बोटांचे ठसे जुळत नसलेल्यांचे डोळे स्कॅन करून धान्य वितरित करता येणार आहे.

# भरधाव मिनी ट्रकची दुचाकीला धडक

**जनसंचलन/ नांदुरा**

भरधाव मिनी ट्रकचालकाने दुचाकीला धडक दिल्याने पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर पती जखमी झाल्याची घटना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील वडी फाट्यानजीक १४ जून रोजी सकाळी ११:४५ वाजेदरम्यान घडली. याबाबत जानकीराम तुकाराम निंबाळकर (५९), रा. नवी येरळी, ता. नांदुरा यांनी पोलिसात तक्रार दिली. त्यामध्ये ते पत्नीसह दुचाकीने राष्ट्रीय महामार्गाने येत असताना वडी फाट्यानजीक मिनी ट्रक क्रमांक एमएच २७ एक्स ७८४० च्या चालकाने दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यामुळे दुचाकीस्वार मनोरमा जानकीराम निंबाळकर (४८) यांचा जागीच मृत्यू झाला, तर तक्रारकर्ता जखमी झाल्याचे म्हटले. याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी मिनी ट्रकचालकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षणावर भर द्यावा-डॉ.नीलम गोर्‍हे

वृत्तसंस्था/ पुणे

बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी अस्तित्वात असलेल्या नियमांमध्ये सुधारणा करण्यासोबत शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणासोबत पाल्य आणि पालकांच्या प्रशिक्षणावर भर द्यावा, तसेच वाहतूक नियोजन आणि रस्ता सुरक्षेबाबतही आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिले. पुण्यात अलिकडे झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियोजन, बालगुन्हेगारी आणि ससून रुग्णालयातील व्यवस्थापनाबाबत दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस महिला व बालविकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, महानगरपालिका आयुक्त राजेंद्र भोसले, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवडचे प्र.पोलीस आयुक्त सुनील रामानंद, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, ससूनचे अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत म्हस्के, उत्पादन शुल्क विभागाचे उपअधीक्षक सुजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते. डॉ.गोऱ्हे म्हणाल्या, बाल न्याय कायद्यानुसार गंभीर गुन्ह्याबाबत कारवाई करतांना गुन्हेगारांना प्रौढ समजण्यात यावे यादृष्टीने नियमांचा अभ्यास करून कार्यप्रणाली निश्चित करण्याचा प्रयत्न करावा. जिल्हाधिकाऱ्यांकडे होणाऱ्या बाल कल्याण समितीच्या बैठकांमधील कामकाज गांभिर्याने होईल याकडे लक्ष द्यावे. बाल गुन्हेगारी रोखण्यासोबत गंभीर गुन्ह्यात शिक्षा होईल यादृष्टीने कार्यवाही करण्यावर भर द्यावा. महानगरपालिकेने शाळाबाह्य मुलांना शाळेत आणण्याची मोहिम राबवावी, यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. पोलीस विभाग गुन्हे शोधण्यासाठी उपयोग करीत असलेली सीसीटीएनएस प्रणाली बाल गुन्हेगारांसाठी लागू करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येईल. शहरातील ब्लॅकस्पॉटची माहिती संकलीत करून अशा ठिकाणी सीसीटीव्ही लावल्यास वाहतूकीवर चांगल्याप्रकारे नियंत्रण करता येईल. विविध सण आणि उत्सवाच्या कालावधीत वाहतूक नियंत्रणाबाबत आतापासून नियोजन करावे. शहरातील अतिक्रमणे काढण्याबाबत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा अहवाल महानगरपालिकेने सादर करावा. महानगरपालिका आणि पोलीस विभागाने अपघात रोखण्यासाठी संयुक्त मोहिम राबवावी. ससून रुग्णालयाने नागरिकांच्या तक्रारी कमी करण्यावर भर द्यावा. आरोग्य सेवेत ससून रुग्णालयाचा लौकीक चांगला असून तो वाढविण्याचा प्रयत्न करावा. आरोग्य क्षेत्रातील चांगल्या स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींची मदत घेवून कामकाजात पारदर्शकता वाढविण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले. मद्यसेवनासाठी परवाना देण्यासाठी भरावयाचे शुल्क वाढविण्याबाबत आणि एक दिवसाचा परवाना देतांना मुले अल्पवयीन आहेत कां यीची काटेकोर नियमावली करणे शक्य आहे का याचा विचार करावा. मद्य विक्री आणि परवान्याचा वापर याचा ताळमेळ घेण्याची व्यवस्था निर्माण करता येईल का याचा विचार करावा. अवैध दारू विक्रीवर प्रतिबंध करण्यासाठी विशेष मोहिम राबवावी, असे निर्देशही डॉ.गोऱ्हे यांनी दिले. आयुक्त श्री.नारनवरे, बाल न्याय कायद्यानुसार बालगुन्हेगारांचे पुर्नवसन करण्यावर भर देण्यात आला आहे. बाल न्याय मंडळातील महिला व बालविकास विभागातर्फे नियुक्त प्रतिनिधींच्या प्रशिक्षणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. वारंवार गुन्हे करणारे आणि गंभीर गुन्ह्यातील बालगुन्हेगारांवर कारवाई करण्यासाठी नव्या बाल कायद्याबाबत राज्यासाठीची नियमावली लकवरच करण्यात येत आहे. त्यात प्रशिक्षण आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर देण्यात येणार आहे. बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समितीच्या कामकाजातही सुधारणा करण्यात येत आहे. महानगरपालिका आयुक्त श्री.भोसले म्हणाले, अनधिकृत हॉटेल आणि रुफ टॉप हॉटेलवर महानगरपालिकेतर्फे कारवाई करण्यात आली आहे. शहरातील पदपथावरील आणि रस्त्याच्या बाजूला असेलेली अतिक्रमणे काढण्याची मोहिम सुरू करण्यात आली आहे. नियमबाह्य जाहिरात फलकांवर कारवाई करण्यात येत आहे. वाहतूक सुरक्षेच्यादृष्टीने रस्त्यांच्या रचनेत सुधारणा करण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, पुणे शहरातील वाहतूक सुरक्षेबाबत मागील १५ दिवसात पालकमंत्री अजित पवार




यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली असून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. शहरातील सुमारे ५० ब्लॅकस्पॉटबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. अवजड वाहनांना शहराच्या मध्यभागात वाहतूकीसाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. १६ ते १८ वर्षातील बालगुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी पालकांचे समुपदेशन करण्यात येत आहे. पोलीस आयुक्त श्री.रामानंद म्हणाले, पिंपरी चिंचवड शहरात रात्री ड्रिंक ॲण्ड ड्राईव्हला प्रतिबंध घालण्यासाठी विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे वाहतूक नियमांविषयी समुपदेशन करण्यात येत आहे. डॉ.म्हस्के म्हणाले, ससून रुग्णालयाच्या कामकाजात पारदर्शकता आणि सुसूत्रता आणण्यासाठी आदर्श प्रणाली निश्चित करण्यात आली आहे. दररोज कामकाजाचा आढावा घेण्यात येत आहे. चांगली रुग्णसेवा देण्याचा रुग्णालय प्रशासनाचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले. अतिरिक्त आयुक्त श्री.खोराटे यांनी पिंपरी चिंचवड शहरात वाहतूक नियोजन आणि रस्ता सुरक्षेबाबत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. उत्पादन शुल्क विभागाचे श्री.पाटील यांनी उत्पादन शुल्क विभागातर्फे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

# सोमवारपासून कृषि संजीवनी पंधरवडा

जनसंचलन/बुलडाणा

देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने सोमवार, दि. १७ जून ते १ जुलै, २०२४ या कालावधीत कृषि संजीवनी पंधरवडा राबविण्यात येणार आहे. या पंधरवड्यामध्यू विविध उपक्रम राबविण्यात येतील. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि संजिवनी पंधरवडाची सांगता दि. १ जुलै २०२४ रोजी स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनी कृषि दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या पंधरवड्यामध्ये प्रत्येक दिवशी विशिष्ट उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावरील कृषि संजीवनी सप्ताहात दि. १८ जून २०२४ रोजी कृषि विज्ञान केंद्रात पी. एम. किसान उत्सव दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील १३ तालुक्यात विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या पंधरवड्यात दि. १७ जून रोजी बीजप्रक्रिया जनजागृती दिन, दि. १८ जून रोजी पी. एम. किसान उत्सव दिवस, दि. १९ जून रोजी जमिन सुपिकता जागृती दिन, दि. २० जून रोजी गुणवत्तापूर्ण निविष्ठांची ओळख दिन, दि. २१ जून रोजी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड व प्रसार, दि. २२ जून रोजी पिक विमा जनजागृती दिन, दि. २३ जून रोजी हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञान प्रसार दिन, दि. २४ जून रोजी सोयाबीन व मका लागवड तंत्रज्ञान दिन, दि. २५ जून रोजी कापूस, भात व ऊस लागवड तंत्रज्ञान दिन, दि. २६ जून रोजी तूर व इतर कडधान्य लागवड तंत्रज्ञान दिन, दि. २७ जून रोजी कृषि महिला शेतकरी सन्मान दिन, दि. २८ जून रोजी जिल्ह्यातील महत्त्वाच्या पिकांची




कीड व रोग नियंत्रणाच्या उपाययोजना, दि. २९ जून रोजी शेतकरी मासिक वाचन दिन च वर्गणीदार वाढविणे, दि. ३० जून रोजी प्रगतशील शेतकरी संवाद दिन, दि.१ जुलै रोजी कृषि दिन साजरा करण्यात येणार आहे. कृषि संजीवनी पंधरवड्याचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याने दुचाकी पेटवली!

जनसंचलन/ खामगाव



खामगाव पोलिसांत दिलेल्या :तक्रारीचा वचपा काढण्यासाठी घराच्या आवार भिंतीलगत ठेवलेली दुचाकी पेटविण्यात आली. ही घटना शुक्रवारी (दि. १४) पहाटे घडली. याप्रकरणी तक्रारीवरून शहर पोलिसांनी दोघांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, सिव्हिल लाइन भागातील सपना अशोक मुंढे (३२) व दाळ फैलातील नितीन खिरडकर यांच्या जुना वाद आहे. या वादाची तक्रार सपना मुंढे यांनी महिनाभरापूर्वी शहर पोलिसांत दिली होती. त्यामुळे वचपा काढण्यासाठी सपना मुंढे यांच्या घराच्या आवार भिंतीलगत ठेवलेली गजानन तुळशीराम इंगळे यांची दुचाकी (क्र. एमएच २८ एडी १८२०) दोघांनी पेटवून दिली. त्यामुळे इंगळे यांचे सुमारे दहा हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. ही दुचाकी नितीन शंकरराव खिरडकर (४४) आणखी एकाने पेटवून दिल्याचे सपना मुंढे यांनी तक्रारीत म्हटले. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी दोघांविरोधात भादंवि कलम ४३६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल गजानन पाटील करीत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पोलिसांच्या मालमत्तेवर चोरट्यांचा डल्ला पावणेतीन लाखांचा मुद्देमाल दामटला!

जनसंचलन/चिखली

येथील पोलीस कवायत मैदानापासून काही अंतरावरच असलेल्या पोलिसांच्या नवीन वसाहत इमारतीमधील लाखो रुपयांचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची धक्कादायक घटना काल १४ जून रोजी उघडकीस आली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस कवायत मैदानानजीक पोलिसांची नवीन वसाहत इमारत आहे. या इमारतीचे पूर्ण बांधकाम झाले असून इंटेरिअरिंगचे कामे सुरू आहे. इमारतीत एकूण ११२ फ्लॅटची बांधणी करण्यात आली आहे. त्यामध्ये प्लबिंगचे काम सुरू आहे. यासाठी प्लंबिंग साहित्यासह, महागडे नळ, शावर त्याठिकाणी ठेवण्यात आले होते. दरम्यान, दरवाजा उघडा असल्याने ८ जून ते १३ जूनच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी सर्व महागडे साहित्य लंपास केले. खाजगी इंजिनियर कॉन्ट्रॅक्टर गोपाल पवार यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी शहर पोलिसांत



तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनास्थळी पोहचून ठाणेदार नरेंद्र ठाकरे यांनी पाहणी केली.

# महेश नवमीनिमित्त लोणार येथे तीनदिवसीय कार्यक्रम

जनसंचलन/ लोणार

माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिवस आज दि. १५ जून रोजी आहे. या निमित्ताने माहेश्वरी समाजाच्या वतीने दि. १३ जून रोजी लोणार येथील स्मशाभूमीत स्वच्छता करण्यात आली. यावेळी अनेकांची उपस्थिती होती. आज दि. १४ जून रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सोबतच राममंदिर येथे महिलांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे, तर उत्पत्तीदिनी १५ जून रोजी सकाळी ७ वाजता भगवान महेश यांचा अभिषेक, तर ९ वाजता मोटारसायकल रॅली, सायंकाळी ५ वाजता सजीव देखावे असलेल्या भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.सदर शोभायात्रा ही श्री मंगल कार्यालय येथून हिरडव चौक, लोणी रोड, श्री टॉकीजमार्गे परत श्री मंगल कार्यालय येथे येईल. आयोजित कार्यक्रमामध्ये माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष रवी काबरा यांच्या अध्यक्षतेत समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. समाजाचे नाव विविध क्षेत्रात उज्वल करणाऱ्या व्यक्तींचा सत्कारही होणार आहे. माहेश्वरी समाज उत्पत्तीवर नाटिका होऊन आरती आणि प्रसाद घेऊन कार्यक्रमाचा समारोप होणार असल्याची माहिती माहेश्वरी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी नागरी सत्काराचा कार्यक्रम बाजुला ठेवून चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या गावाची केली पाहणी..

# देऊळगाव घुबे येथील मृतक सईच्या कुटुंबाना ४ लाखांचा धनादेश दिला..

जनसंचलन/बुलडाणा

१२ जूनच्या सायंकाळी चिखली तालुक्यातील काही गावांमध्ये वादळी वाऱ्यांसह पाऊस झाला होता .वादळी पावसामुळे गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात झाले होते केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव जिल्ह्यात दाखल झाल्यानंतर त्यांनी नागरी सत्कार बाजूला ठेवून नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आणि मृतक सई च्या घरी सांत्वनपर भेट दिली तिच्या परिवाराला आधार देत शासनातर्फे चार लाख रुपयांच्या सानुग्रह अनुदानाचा धनादेशही दिला तीन दिवसांआधी १२ जुनच्या सायंकाळी चिखली तालुक्यातील देऊळगाव घुबे येथे वादळाने थैमान घातले होते.या वादळी पावसामुळे परिसरामध्ये नागरिकांच्या घरावरची टिनपत्रेही उडून गेली शेतमालाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते यामध्येच सई साखरे नावाची ६ महिन्यांची चिमुकली छताला बांधालेल्या झोक्यासह उडून गेली होती, त्या दुर्घटनेत तिचा जागीच मृत्यू झाला होता. दरम्यान आज १५ जुनला केंद्रीय मंत्री नामदार प्रतापराव जाधव बुलढाणा जिल्ह्यात आल्यानंतर त्यांनी सत्काराचे कार्यक्रम बाजूला ठेवून आधी देऊळगाव घुबे गाठले. वादळाने नुकसान झालेल्या ग्रामस्थांना धीर दिला. मृतक सई साखरेच्या कुटुंबियांच्या घरी जाऊन





तिच्या आई-वडिलांचे सांत्वन केले साखरे परिवाराला धीरदेत ४ लाख रुपयांच्या शासकीय मदतीचा धनादेश दिला यावेळी देऊळगाव घुबे गावात वादळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली नारायण करवंडे यांच्याही घरी भेट देऊन पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली त्यानंतर चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथील शेतकरी रामेश्वर पडघान आणि त्यांचा मुलगा वैभव यांचा विजेचा करंट लागल्याने मृत्यू झाला होता या कुटुंबीयांच्या घरी केंद्रीय मंत्र्यांनी सांत्वनपर भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचं सांत्वन केलं ..केंद्र आणि राज्य सरकार आपल्यासोबत आहे. नुकसानग्रस्तांना तातडीने मदत मिळेल असा शब्द यावेळी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिला. साबेतच अधिकाऱ्यांनाही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी तात्काळ कारवाई करण्याचे निर्देशित केले यावेळी त्यांच्यासोबत माजी आमदार शशिकांत खेडेकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि महसूल प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते

# त्या मुलीचे लग्न उरकले मात्र जबाबावरून कलमांमध्ये वाढ

## १९ मे रोजी मध्यरात्री नेले होते पळवून



जनसंचलन/मोताळा

एका अल्पवयीन मुलीला आमिष दाखवून पळवून नेल्याची घटना १९ मे रोजी मध्यरात्री सव्वाबाराच्या सुमारास उघडकीस आली होती. या प्रकरणी फिर्यादीवरून बोराखेडी पोलिसांत तिघाजणांविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, मुलीने दिलेल्या जबाबावरून त्या अल्पवयीन मुलीचे लग्न लावून दिल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे बोराखेडी पोलिसांनी या घटनेत कलमांमध्ये वाढ केली असून, आरोपींच्या संख्येतही वाढ होण्याची शक्यता आहे. तालुक्यातील एका गावातील साडेपंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीला संजय लक्ष्मण शिरकारे, गणेश संजय शिरकारे आणि विजय संजय शिरकारे यांनी फूस लावून पळवून नेल्याची फिर्याद मुलीच्या वडिलांनी बोराखेडी पोलिसांत दिली होती. त्यानंतर अपहरणाचा गुन्हा दाखल करून सहायक पोलिस उपनिरीक्षक यशवंत तायडे यांनी प्रकरणाचा तपास केला होता. या प्रकरणात पीडित मुलगी आणी तिच्या आईवडिलांना जबाबासाठी ११ जून रोजी बोलाविले होते. यावेळी मुलीचा जबाब घेतला असता गणेश शिरकरे याने १९ मे रोजी रात्री पीडित मुलीला आईचा फोन आल्याचे सांगत घरामागे बोलावले. यावेळी संजय शिरकारे आणि विजय शिरकारे यांनी बळजबरीने तिला दुचाकीवरून फत्तेपूर, खामगाव, चिखली, भाडगणी या भागांत नेले. तेथे तिच्यावर दबाव टाकून तिचे लग्न लावून दिले, असा दबाव पीडित मुलीने व तिच्या आईने दिला. त्यावरून पोलिसांनी पोक्सोसह अन्य कलमांची वाढ केली आहे.